## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ )

जा.क्र. ८१४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १२/१२/२०१६

**१) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १०/१२/२०१६ रोजी ११.०० वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी हिला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहनगर येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा जनबंधु पोस्टे जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) बार रेस्टॉरेन्ट मधील सामान व रोखरंक्कमची चोरी :–**

दिनांक १०/१२/२०१६ चे २२.०० वा. ते दि. ११/१२/२०१६ चे ०५.०० वा. दर. यातील फिर्यादीचे नैतीक बार व रेस्टॉरेन्टचे समोरील शटर्सचे कोणीतरी अज्ञात चोराने ताले तोडुन आत प्रवेश करून काऊन्टरचे जवळील रूमचा ताला तोडुन ड्रॉप ठेवलेले नगदी १०,०००/–रू, तसेच गोडाऊन स्टॉकरूमचा कोंढा तोडुन गोडाऊन रूम मधील रॉयल स्टॅक कंपनीच्या ३ तिन पेटया १८० एमएल १४४ नग, नंबर १ कंपनीचे रेड डम २ पेटया १८. एमएलच्या ९६ नग, हॅवर्ड ५००० कंपनीची १ पेटी बियर ६५० एमएलच्या १२ नग असा एकुन ६०९५४/–रू चा माल चोरून नेल्याने फिर्यादी सुनिल महादेव जांभुळकर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा मेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३)मोटार सायकलची चोरी :–**

दिनांक ११/१२/२०१६ चे ११.३० वा. दर. यातील फिर्यादीचे बंडी सुखराम माडु वय २१ वर्ष रा. गोसे खुर्द पो.स्टे. अडयाळ हा डॉ. रंगारी यांचे दवाखाण्यात आपले आईला मोटार सायकलने औषधउपचार करण्यासाठी आणले असता आपली मोटार सायकल हिरो एचएफ डिलक्स क्र. एमएच ३६ एस ३१०३ कि. २५,०००/–रू ची नर्सीग होम समोर ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने कुनीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. तोडासे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) शेतातुन धानाच्या बोऱ्यांची चोरी. :–**

दिनांक १०/१२/२०१६ चे १८.०० ते दिनांक ११/१२/२०१६ चे ०६.३० वा. दर. यातील फिर्यादी अरुन मारोती कंगाले वय ४७ वर्ष, रा. मासलमेठा यांचे शेतात जय श्रीराम जातीचे धानाचे २३ बोरे पांढऱ्या पिवळया रंगाच्या बोरीत भरुन ठेवले असता त्यापैकी ११ धानाचे बोरे कि. ११,०००/–रु. चे कोणीतरी अज्ञात चोराने कुनीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. थेर पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे.

**५) हॅन्ड बॅग मधुन मंगळसुत्राची चोरी. :–**

दिनांक १०/१२/२०१६ चे १७.४५ ते १८.१० वा. दर. यातील फिर्यादी सौ. स्वरुप राहुल बडोले वय २६ वर्ष, रा. रमाबाई आंबेडकर वार्ड भंडारा ही पती सोबत गोंदीया येथे जाण्याकरीता ऑटोने जि. प. चौक भंडारा येथुन वरठी बसस्टॉप कडे निघाली असता तिच्या हॅन्ड बॅग मध्ये ठेवलेले अंदाजे ४ तोळयाचे सोन्याचे मंगळसुत्र किं अंदाजे १,२०,०००/–रु. चे कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन फिर्यादीला वरठी बसस्टॉप येथे पोहचल्या नंतर लक्षात आल्याने आज रोजी फिर्यादीने पोस्टेला येवुन मंगळसुत्र चोरी झाल्याबाबतची तोंडी रिपोर्ट दिल्याने पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. हलमारे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहे.

(पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.) – शिक्का)

(स्वाक्षरी)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९०४९००३३७२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.